KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)

# संशोधन कार्यात विविध माध्यमांचा उपयोग

**डॉ. बाळू तिखे**
सहा. प्राध्यापक, मराठी विभाग
श्री. अटल बिहारी वाजपेयी शासकीय कला एवं
वाणिज्य महाविद्यालय, इंदोर ( म. प्र)

संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. संशोधन हे कधीही पूर्ण होऊ शेकत नाही. जे आहे त्यातच नव्याने काही शोधण्याचा सतत प्रयत्न केला जातो. म्हणूनच इंग्रजी मध्ये त्याला रिसर्च असे म्हणत असावे. रिसर्च किंवा संशोधन म्हंटल्यावर अनेकांना प्रयोग शाळेत केले जाणारे प्रयोग म्हणजेच संशोधन असे वाटते. पण संशोधनाची व्याख्या तेवढ्यापुरतीच मर्यादित नाही.

आज सर्वच क्षेत्रात संशोधन होतांना दिसते त्याची विविध कारणे आणि हेतू सांगता येतील पण विशेषतः शैक्षणिक क्षेत्रात एम.फिल किंवा पीएचडी मिळण्यासाठी संशोधन करावे लागते त्याव्यतिरिक्त अनेक कारणे सांगता येतील जसे ज्ञानसमृध्दी, व्यावसायिक उपयुक्तता, शासकीय किंवा व्यावसायिक धोरण ठरवण्यासाठी एखादया घटनेच्या मुळांशी जाऊन तिचे संपूर्णपणे विश्लेषण करणे हे संशोधनाला चालना देत असते. या सगळयापेक्षा महत्वाच कारण म्हणजे स्वतःच्या समाधानासाठी व कुतूहलापोटी आज संशोधन होतांना दिसते.

संशोधन हे कुठल्याही प्रकारचं असो किंवा कुठल्याही उद्देशाने सुरु केलेले असो. त्या संशोधनासाठी म्हणून काही एक नियम व अटी घालून दिलेल्या आसल्याने ते एका चौकटीत बंदिस्त असते.

'भाषा व साहित्याचे संशोधन' हे इतर संशोधनापेक्षा निश्चितच वेगळे असते. भाषा हे संशोधनाचे एक साधन आहे. मुळातच संशोधनाचा व्यवहार हा भाषेच्याद्वारे चालतो. संशोधन हे अस्सल दर्जाचे होण्यासाठी पुराव्यांची आवश्यकता असते. संशोधन हे या पुराव्याच्या आधारे पूर्णत्वास जात असते, नव्हे ते सिद्ध होते. हे पुरावे विविध माध्यमातून शोधावे लागतात त्यामुळे या विविध माध्यमांचा उपयोग संशोधनात कसा केला जातो ते पाहणे गरजेचे आहे.

संशोधन हे संदर्भसाधनांवर आवलंबून असते. त्यावरुन आपल्याला या संशोधनाचा दर्जा लक्षात येतो. या संदर्भात स.ग. मालशे म्हणतात की, "संशोधनाच्या प्रक्रियेमध्ये संदर्भसाधनांचा शेध ही पायरी अत्यंत महत्वाची आहे."[१] ही संदर्भसाधने आज वेगवेगळया माध्यमात उपलब्ध आहे. त्या माध्यमांचा संशोधनात महत्वाचा वाटा आहे. आज संदर्भसाधना शिवाय संशोधन परिपूर्ण होऊ शकत नाही. या माध्यमांच्याद्वारे त्या संदर्भसाधनाची माहिती मिळवता येते. ही माध्यमे खालील प्रमाणे नोंदवता येईल.

**मुद्रित माध्यम :**

या माध्यमालाच आपण लिखित माध्यम म्हणूनही संबोधतो. या माध्यामाच्या मदतीशिवाय संशोधन हे शक्य नाही. विशेषतः भाषा व साहित्य संशोधनासाठी जी काही आवश्यक संदर्भसाधने असतात ती या माध्यमातूनच उपलब्ध होत असतात. या माध्यमात प्रामुख्याने 'ग्रंथालय' ही महत्वाची भूमिका बजावत असतात.

**ग्रंथालय :**

मुद्रित माध्यमातील संशोधनासाठीचे अत्यंत महत्त्वाचे साधन म्हणून ग्रंथालयाकडे बघता येईल. या संदर्भात डॉ. विवेक पाटकर म्हणतात की, " संशोधनाच्या अनेक टप्प्यावर ग्रंथालयाची मदत होते. एखादया विषयाची माहिती मिळवतांना ग्रंथालयातील पुस्तक, जर्नल्स, माहितीपत्रक, सीडीज, अशा विविध माध्यमांची मदत घेता येते. संशोधनाची सुरवात करतांना ग्रंथालय मार्गदर्शकाचे काम करतात."[२] यावरुन मुद्रित माध्यमातील एक महत्वाचे साधन म्हणून ग्रंथालय संशोधनात उपयोगी ठरते. एवढेच नव्हे तर संशोधनासाठी आपण निवडलेल्या विषयावर आतापर्यंत कोणी आणि कशातऱ्हेने काम केले आहे याबद्दल ग्रंथालयाकडून माहिती मिळू शकते. वेगवेगळया विद्यापीठातून झालेल्या संशोधनाची सूची आणि त्याचा सारांश देणारी अनेक पुस्तके, नियतकालिके, लघुनियतकालिके, मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे, दिवाळी अंक, अग्रलेख, विशेष साप्ताहिक पुरावण्या या सगळयातून संशोधन विषयाच्या संदर्भात माहिती मिळवता येते.

'भाषा व साहित्य संशोधना' च्या संदर्भात आज अनेक वाङमयीन नियतकालिके उपलब्ध आहे. उदा. सक्षम समीक्षा, खेळ, कवितारती, परिवर्तनाचा वाटसरु, प्रतिष्ठान अक्षरयात्रा, पैलू,

भूमी, अस्मितादर्श, नवअनुष्ठुभ, नवाक्षरदर्शन, साक्षात, उर्मी, अतिरिक्त यासारख्या अनेक वाङ मयीन नियतकालिके व लघुनियतकालिकेतून संशोधकाला संशोधन विषयाच्या संबंधित माहिती मिळते." तसेच जगातील बहूतेक सर्व विषयातील प्रसिद्ध होणाऱ्या नियतकालिकांचे तपशील देणारी Ulrich's periodicals directory आणि भारतातील कोणत्याही मोठया ग्रंथालयात उपलब्ध असणाऱ्या नियतकालिकांची माहिती देणारी पुस्तकं संशोधकाला अनेक प्रकारे मदत आणि मार्गदर्शन करतात''[३] तसेच ग्रंथालयात विविध शब्दकोश, विश्वकोश, ज्ञानकोश, कोशसदृश्य वाङमय, सूची वाङ मय यामुळे संशोधकाला अचूक व्याख्या, संकल्पना आणि परिभाषा समजण्यास मदत होते.

**कोश वाङ्मय :**

कोश वाङमयाचा उपयोग संशोधनात महत्वाचा आहे त्याचे तीन टप्पे पडतात.

१) विविध प्रकारची माहिती मिळवून त्यांच्या नोंदी केलेल्या असतात.

२) माहितीचे विषयवार वर्गीकरण केलेले असते.

३) 'आकारविल्हयानुसार' Alphabetically ही माहिती झालेले असते.

**कोश वाङ्मयाचे चार वर्ग :**

**१. शब्द कोश-**

यामध्ये शब्दाचा संग्रह आणि त्याचे अर्थ दिलेले असतात.

**शब्द कोशाचे प्रकार :**

**१.१) सर्वसंग्राहक शब्दकोश :**

याचे एकभाषी, द्वैभाषी व बहूभाषी असे उपप्रकार पडतात. याची उदा.

१. सर मोकादम यांनी इंग्लिश शब्दाला मराठी शब्दाचा अर्थ देण्याचा प्रयत्न केला आहे तो द्वैभाषी शब्दकोश होय.
२. इंग्रजी- मराठी- संस्कृत- हिंदी हे बहुभाषी कोश होय.
३. विशिष्ट शब्दकोश - उदा. फक्त ज्ञानेश्वरीमधील शब्द यांचा शब्दकोश
४. परिभाषा कोश - पारिभाषिक शब्दांचा कोश यात येतात. उदा. समीक्षा परिभाषा कोश,
५. वैज्ञानिक परिभाषा कोश संज्ञासंकल्पना कोश
६. व्युत्पत्ती कोश - उदा. मु. म. पठाण यांचा कार्साचा व्युत्पत्ती कोश
७. एकेका ग्रंथातील शब्दाचा अर्थ संग्रह केलेला कोश
८. समानार्थक आणि विरुध्दार्थी शब्दाचा कोश
९. म्हणी आणि वाक्प्रचारांचा कोश
१०. एकाक्षरी शब्दांचा कोश

**१. २ विश्वकोश / ज्ञानकोश (श्री. व्यं. केतकर)**

ज्ञानाचे काम करण्याच्या पद्धतीने तयार केलेला कोश म्हणजे ज्ञानकोश किंवा विश्वकोश होय.

**विश्वकोशाचे प्रकार :**

१. सर्वसंग्राह
२. विशिष्ट शास्त्रीय
३. चरित्रकोश
४. धर्मकोश
५. दैवतकोश
६. संस्कृतीकोश
७. भौगोलिक कोश
८. ऐतिहासिक कोश
९. वाङमय कोश

**१.३ कोशसदृश्य वाङ्मय :**

याची सूचना प्रत्यक्ष कोशपद्धतीने झालेली नसते. पण याचा उद्देशही एखादा विषय, प्रवेश या संबंधी माहिती संकलित करुन ( वस्तूनिष्ठपणे) वाचकांना बहूश्रूत करणे हाच असतो. समाजभाषाविश्वकोश हा कोशसदृश्य वाङमय प्रकार आहे.

**सूची वाङ्मय :**

सूची हे शास्त्र आहे त्याचा संशोधकाला परिचय हवा. ज्ञानसंचयाच्या दिशा सूची वाङमयातून मिळतात. थोडक्यात ग्रंथालयातून उपलब्ध होणारे ही संदर्भसाधने विश्वसाहर्य असतात. म्हणून या सगळया ग्रंथालयातील मुद्रित साधनाचा संशोधनासाठी वापर केला जातो.

अनेक ग्रंथालयामध्ये आज अंकिय स्वरुपात Digital Form संदर्भग्रंथ उपलब्ध आहे. याशिवाय आजच्या संगणकाच्या व मोबाईलच्या युगात संशोधनाला पुरक अशा संकेतस्थळांची योग्य माहिती ही ग्रंथालयाच्या मार्फत मिळते. आपल्या संशाधन कार्यात या मुद्रित माध्यमांचा म्हणजे ग्रंथालयाचा जास्तितजास्त वापर केल्यास संशाधकाला आपल्या कामात नवीन आणि

खात्रीलायक माहितीचा समावेश करता येतो. सहाजिकच त्यामुळे या संशोधन कार्याचा दर्जा वाढतो.

**ईलेक्ट्रॉनिक माध्यम :(दृकश्राव्य माध्यम )**

मुद्रित माध्यमानंतर आता अलिकडे नव्याने ई-माध्यमांचा मोठया प्रमाणावर संशोधन कार्यात वापर होऊ लागला आहे. माध्यमाच्या मुद्रित, श्राव्य व दृकश्राव्य माध्यमांपैकी मुद्रित आणि दृकश्राव्य या माध्यमांचाच संशोधन कार्यात उपयोग होतो.

सुरवातीच्या (पारंपरिक)संशोधनात केवळ मुद्रित माध्यमांचा वापर होत होता. या मुद्रित माध्यमाबरोबरच ईलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर वाढला तशी सर्वच क्षेत्रातील संशोधनाला एक गती मिळाली. त्याचबरोबर त्या माध्यमाकडै एक विश्वसनीय स्त्रोत म्हणून पाहिले जावू लागले आहे.

या ई-माध्यमात प्रामुख्याने दूरचित्रवाणी, इंटरनेट, ब्लॉक, सर्च इंजिन (गुगल, विकिपीडीया), व्टीटर, प्रोटॉल, ई-बुक, ई-मासिके, या सर्व प्रकाराच्या ई-माध्यमांमुळे संशोधन हे अधिक विश्वसनीय व वेगवान बनले. कारण या माध्यमांत माहितीचा खजाना आहे. पूर्वीच्या म्हणजे पारंपारिक संशोधनात ग्रंथालयात जावे लागत होते. आज ते संपूर्ण ग्रंथालयच या ई-माध्यमाने आपल्या घरी आले आहे. त्यामुळे संशोधन कार्य सोपे व सुलभ झाले आहे. पूर्वी संशोधकाला संशोधन कार्याच्या निमित्ताने मुलाखत घेण्यासाठी त्या व्यक्तिला किंवा स्थळाला प्रत्यक्ष भेट दयावी लागत असे. पाण आज या ई- माध्यमामुळे मोबाईल फोन, स्मार्ट फोन, ई-मेल, फेसबुक, व्टीटर, यामुळे आपण त्या व्यक्तिशी (स्थळाशी) कधीही संवाद साधू शकतो. आपल्या विषयाशी संबंधीत प्रश्न विचारुन त्याची उत्तरे घेऊ शकतो. इतके सहज व सोपे बनले आहे. त्यामुळे आपला वेळ व परिश्रम या गोष्टी वाचतात हे सार - माध्यामातुन शक्य झाले आहे. हे नाकारून चालणार नाही.

संशोधन कार्यात मुद्रित माध्यम आणि ईलेक्ट्रॉनिक माध्यम ( दृकश्राव्य ) या दोन्हींचा सारखाच वाटा असला तरी जोपर्यंत संशोधनासाठी केवळ मुद्रित माध्यमेच उपलब्ध होती तोपर्यंत संशोधन कार्य हे अतिशय हळूवार होत होते. परंतु जसे या ई-माध्यमांचा वापर यामध्ये होऊ लागला तेव्हापासून या संशोधनाला वेग व गती मिळाली व हे संशोधन विश्वसनीय होऊ लागले.

या माध्यमांमुळे संशोधनात काही चांगल्या बाबी झाल्या तशाच काही वाईट व अडचणीच्या बाबींही समोर येऊ लागल्या. या माध्यमांमुळे संशोधनासाठीची संदर्भ माहिती मिळू लागली पण तिचे संदर्भ देतांना अनेक अडचणी येतात. त्याच बरोबर ऑन लाईन चौर्य याचे प्रमाण ही वाढते आहे. (विशिष्ट अशा सॉफ्टवेअरमुळे त्याचे प्रमाण आज कमी होत आहे. ) हे नाकारून चालणार नाही. समारोप :

पारंपरिक संशोधन हे केवळ ग्रंथालयीन होते. त्यामुळे त्यात माहितीचा अभाव जाणवतो. आर्थिक स्त्रोतांची मर्यादा ही जाणवते. परंतू नव ईलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या वापराने व वेगवेगळया सर्च इंजिनच्या सहाय्याने आजचे संशोधन हे अधिक विश्वसनीय व वैश्विक पातळीवर पोहचले आहे, ते अस्सल, दर्जेदार व बहूआयामी असे बनले आहे असेच म्हणावे लागेल.

**संदर्भ टिपा :**

१. मालशे स.गं., 'शोध निबंधाची लेखन पद्धती' लोकवाङमयगृह, मुंबई, सुधारित आवृत्ती (मिलिंद मालशे) २००६, पृ. २१.

२. पाटकर विवेक, 'संशोधन मार्गावरील प्रवास', दि पॅकेज, मुंबई, प्रथम आवृत्ती २००७, पृ. १७

३. तत्रैव, पृ. १८

४. भाषा व साहित्य संशोधन खंड २, (महाराष्ट्र साहित्य परिषद, पूणे )